RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक ६३(२२)] बुधवार, ऑक्टोबर ९, २०२४/आश्विन १७, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-९६/ई-२६९५७४४/सी.आर.६९३/२०२४.—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समूह, वस्ती/वस्त्यांचा समूह, वाडी/वाड्यांचा समूह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते ;

आणि ज्याअर्थी, **विक्रमगड** तालुक्यातील **सुकसाळे** ग्रामपंचायतीतील **आवळीपाडा** पाडा/ वस्ती/ पाडयांचा समूह / वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे **दिनांक २० मे २०२३** रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, **उपविभागीय अधिकारी, वाडा, विभाग वाडा** यांनी यासंदर्भात **दिनांक ३० मे २०२३** रोजी **सुकसाळे** ग्रामपंचायतीत येणाऱ्या पाडा/वस्ती/पाडयाचा समूह/वस्त्यांचा समूह यांची संबधीत नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे ;

आणि ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी पालघर** यांनी चौकशी अंती संबंधीत पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे ;

आणि त्याअर्थी, मी, **विकास पानसरे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **विक्रमगड** तालुक्यातील **सुकसाळे** ग्रामपंचायतीतील **आवळीपाडा** येथे पाडा/वस्ती/ पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | हद्दीचे तपशील | समूह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| १ | **उत्तरेस** | FDCM क.नं. ३८२ ची हद्द | मातेरा डोंगर |
| २ | **दक्षिणेस** | आंबेघर स.नं. ६० ची हद्द | पोंढा |
| ३ | **पुर्वेस** | शेवता स.नं. ७० ची हद्द<br>FDCM क.नं. ३८४ ची हद्द | देहर्जे बंधारा |
| ४ | **पश्चिमेस** | आंबेघर स.नं. ६० ची हद्द | लोखंडेपाडा |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई,
दिनांक ३ ऑक्टोबर २०२४.

**विकास पानसरे,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.